दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

### मावळमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा डंका!

**मुंबई–**मावळ जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या २०२६ च्या निवडणुकीत आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसने सर्व ५ जिल्हा परिषद आणि १० पंचायत समिती जागांवर घवघवीत यश मिळवले आहे. या विजयानंतर कौतुक करायला अजित पवार हयात नसल्याने सुनील शेळके भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.सुनील शेळके म्हणाले, अजितदादा असते तर आम्ही आज विजयोत्सव साजरा केलया असता. या कठीण परिस्थितीमध्येही मावळच्या मायबाप जनतेने राष्ट्रवादी कॉंग्रेसला साथ दिली. अजित पवार यांनी मावळच्या विकासासाठी हजारो कोटींचा निधी दिला, त्या कामांनाही सुरुवात झाली. आजचा निकाल म्हणजे अजित पवार जनतेने अजित पवार यांच्या ऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न करणे आहे, असे शेळके यांनी म्हटले. तसेच अजित पवारांच्या आठवणीत शेळके यांचे डोळे पाणावले व त्यांनी पुढे बोलणे टाळले.

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com


बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.१० फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १६६ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 10 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 166 • Pages 4 • Rate 4 Rs

# जिल्हा परिषदांवर महायुतीचा डंका

## भाजप क्रमांक एकचा पक्ष, एकनाथ शिंदे यांना मिळाले वाढदिवसाचे गिफ्ट, राष्ट्रवादीनेही गड राखले

**नगरपालिका, महानगरपालिका आणि आता जिल्हा परिषद–पंचायत समितीच्या निवडणुकीतही भाजप–शिवसेना महायुतीने चमकदार कामगिरी करीत दमदार विजय मिळवला आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. विशेष म्हणजे या निवडणुकीत उबाठा गटाला जिल्हा परिषदेत एकही जागा जिंकता आलेली नाही. त्यामुळे आजवरचा हा त्यांचा सर्वात मानहानीकारक पराभव ठरला असून, ग्रामीण भागातील जनतेने ठाकरेंच्या नेतृत्त्वाला स्पष्ट नाकारले, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे.**



| | भाजप | राष्ट्रवादी (अजित पवार) | शिंदेसेना | उद्धवसेना | कॉंग्रेस | राष्ट्रवादी (शरद पवार) | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जि. प. सदस्य | २२५ | १६५ | १६२ | ४३ | ५५ | २६ | ४३ |
| जि. प.वर अध्यक्ष | ०७ | ०२ | ०२ | ०० | ०० | ०१ | ०० |
| पं. स. सदस्य | ४५९ | ३०६ | ३०२ | ८९ | ९७ | ४६ | ८६ |

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितींसाठी या निवडणुका पार पडल्या. महापालिका निवडणुकीनंतर घसरत चाललेल्या मतदानाच्या टक्केवारीबद्दल चिंता व्यक्त होत असतानाच खेड्यापाड्यांतून म्हातारे–कोतारे, आयाबाया आणि तरुणाई मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्याने आश्वासक चित्र दिसले. या निवडणुकीत तब्बल ६८.२८ टक्के मतदान झाले. त्यामुळे लढती अटीतटीच्या होतील, असे तर्क लावले जातात असताना, ग्रामीण मतदारांनी भाजप महायुतीला स्पष्ट कौल दिला.उबाठा आणि कॉंग्रेसला जिल्हा परिषदेत एकही जागा जिंकता आली नाही. तर, पंचायत समितीतही त्यांची कामगिरी अत्यंत निराशाजनक राहिली. या निवडणुकीत भाजप राज्यातील नंबर एकचा पक्ष ठरला असून, भाजपची ग्रामीण भागातील पकड किती खोलवर रुजली आहे, हे स्पष्ट झाले आहे. भाजपनंतर एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस या दोन्ही पक्षांनी सरस कामगिरी केली आहे.राज्यातील १२ जिल्हा परिषदांपैकी आठ जिल्हा परिषदांवर भाजपने वर्चस्व मिळवले. शिवसेनेला तीन जिल्हा परिषदांमध्ये सत्ता मिळाली, तर राष्ट्रवादी कॉंग्रेसला एका जिल्हा परिषदेत यश मिळाले आहे. कॉंग्रेसने कोल्हापूर आणि लातूरमध्ये चांगली कामगिरी केली असली, तरी त्यांना सत्तेसमीप जाण्याइतके संख्याबळ मिळाले नाही. दुसरीकडे उबाठा गटाला जिल्हा परिषदेत खातेही उघडता आलेले नाही. या पराभवामागे उबाठा गटाच्या वरिष्ठ नेतृत्वाची निष्क्रियता कारणीभूत ठरल्याचे मत व्यक्त केले जात आहे. उबाठाच्या एकाही बड्या नेत्याने या निवडणुकीत सक्रिय प्रचार केला नाही किंवा कार्यकर्त्यांना बळ दिले नाही. याचाच परिणाम निकालात दिसून आल्याचा टोला भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी लगावला आहे.

## केजच्या बस स्टँडवर महिलेच्या पर्स मधील दागिने चोरी प्रकरणी गंगाखेड येथून एक महिलेला घेतले स्थागुशाने ताब्यात

### संशयित महिलेस तीन दिवसांची पोलिस कोठडी

दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

भावाच्या लग्नाच्या निमित्ताने माहेरी जात असलेल्या एका विवाहित महिलेच्या पर्स मधून केज च्या बस स्टँडवर ३ लाख ३५ हजार रु. चे सोन्याचे दागिने चोरीला गेलेल्या घटनेतील स्थानिक गुन्हे शाखेने गंगाखेड येथून ताब्यात घेतले आहे..

दि. १ फेब्रुवारी रोजी दुपारी ३:४५ वाजण्याचे सुमारास केज येथील शिक्षक कॉलनीमध्ये राहत असलेल्या अश्विनी गोविंद घोळवे या त्यांच्या भावाच्या लग्नाच्या कार्यक्रमा निमित्त लातूर येथे त्यांच्या माहेरी जात असताना त्या नाशिक–लातूर या बस मध्ये चढत असताना त्यांच्या पर्सची चैन उघडून पर्स मध्ये ठेवलेले १० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, मोठे पट्टीचे सोन्याचे गंठण, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुमके, असे एकूण ३ लाख ३५ हजार ९८० रु. किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते.



दरम्यान अश्विनी घोळवे यांनी दिलेल्या माहिती वरून दि. ७ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलिस अध्यक्ष सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलिस हवालदार दिलीप गिते, पोलीस हवालदार , पोलिस हवालदार भागवत शेलार, महिला पोलीस हवालदार स्वाती मुंढे, पोलिस हवालदार मराडे यांच्या पोलिस पथकाने परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातून एका संशयित महिलेला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी अश्विनी घोळवे यांच्या तक्रारी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ५१/२०२६ भा. न्या. सं. ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने हे तपास करीत आहेत.

_**संशयित महिलेस तीन दिवसांची पोलिस कोठडी :–** संशयित महिलेस तपासी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण किर्तने यांनी न्यायालया समोर हजर केले केले असता संशयित महिलेस ११ फेब्रुवारी पर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान केज येथील अशा प्रकारच्या चोरीचे मोठे रॅकेट असल्याचा संशय असून पोलिस तपास करीत आहेत.

## मद्यधुंद वेगाचा थरार: म्हसावदजवळ रिक्षा उलटून काकू–पुतणीचा जागीच मृत्यू

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

भरधाव वेगात आणि हयगयीने रिक्षा चालवून अपघात घडवल्याची हृदयद्रावक घटना म्हसावद गावाजवळ घडली आहे. या भीषण अपघातात रिक्षा चालकाची पत्नी आणि त्याच्या भावाची अवघ्या ३ वर्षांची मुलगी अशा दोघांना आपला जीव गमवावा लागला आहे. पोलिसांनी संशयित चालकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून त्याला ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. ८ फेब्रुवारी २०२६) दुपारी ३ वाजेच्या सुमारास आरोपी चालक अंतर बारसिंग पवार (वय ४०, राहणार नांदे, तालुका शहादा) हा आपल्या ताब्यातील अप्पे रिक्षा (क्रमांक. एम एच ३९ जे ३०७२) घेऊन चिखली फाटा ते राणीपूर फाटा दरम्यान जात होता. समाधान हॉटेलसमोर आरोपीने रिक्षेचा वेग प्रचंड वाढवला. वेगावर नियंत्रण न राहिल्याने रिक्षा रस्त्याच्या कडेला जोरदार पलटी झाली. या अपघातावेळी रिक्षेत बसलेल्या कुटुंबाला गंभीर दुखापत झाली. यामध्ये: हिनाबाई अंतर पवार (वय ३५ वर्षे,संशयिताची पत्नी) जयश्री कालुसिंग पवार (वय ३ वर्षे, संशयिताच्या भावाची मुलगी) या दोघांचा गंभीर दुखापतीमुळे जागीच मृत्यू झाला. निष्पाप बालिकेच्या मृत्यूमुळे नांदे परिसरात शोककळा पसरली आहे. याप्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल प्रवीण मधुकर पवार यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून संशयित चालक अंतर पवार याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), २८१, १२५ (ए)(बी), ३२४(४)(५) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उप निरीक्षक सुनील बागुल हे करत आहेत.

## शेतकऱ्यांसाठी हा सुवर्ण काळ नाही तर विषकाळ आहे–खा.रजनीताई पाटील




दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

अन्नदाता शेतकरी कायम उपेक्षित राहिला आहे. सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी देशात शेतकऱ्यांसाठी सुवर्णकाळ नाही तर विष काळ आहे.मराठवाड्या तील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे.कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे.ओला दुष्काळ,अतिवृष्टी, नापिकी या दुष्टचक्रात शेतकरी अडकला आहे. यामुळे मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे.बँकांचे कर्ज फेडणे यामुळे तो हतबल होत आहे.या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आत्महत्येला कवटाळावे लागत आहे.हीचिंताजनक बाब आहे.कोट्यवधी रुपयांचे कर्ज बुडवुन उद्योजक देश सोडून पळून जातात पण शेतकऱ्यांचा मात्र बँका छळ करत आहेत. शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत करावी अशा शब्दात खा. रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत सरकारवर निशाणा साधला.

## 'स्वाराती' त हजसाठी जाणाऱ्या भाविकांची वैद्यकिय तपासणी सुरू करा

### खा.बजरंग सोनवणे यांचे आरोग्यमंत्र्यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या वैद्यकीय तपासणी प्रक्रियेत होत असलेल्या विलंबामुळे अंबाजोगाई व परिसरातील भाविकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रतापराव जाधव, महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची वैद्यकीय तपासणी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे करण्यात येते. मात्र सध्या आरोग्य विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन नोंदणी प्रणालीसाठी आवश्यक असलेले आयडी व पासवर्ड केवळ जिल्हा शल्यचिकीत्सकाकडे आहे. यामुळे स्वारातीत यात्रेला जाणाऱ्या भाविकांची वैद्यकिय तपासणी करण्यासाठी असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे वैद्यकीय तपासणी प्रक्रिया सुरू होण्यास विलंब होत असून भाविकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.अंबाजोगाई शहर तसेच आजूबाजूच्या तालुक्यांतून यावर्षी सुमारे १०० हून अधिक भाविक हज यात्रेसाठी जाणार आहेत. अनेक भाविक वयोवृद्ध असून त्यांना जिल्हा रुग्णालयात वारंवार जावे लागत असल्याने



शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. जिल्हा रुग्णालयात आधीच मोठी गर्दी असून मर्यादित सुविधा असल्याने भाविकांची गैरसोय होत असल्याचे चित्र आहे. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे आवश्यक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, मनुष्यबळ व प्रशासकीय क्षमता उपलब्ध असतानाही केवळ प्रशासकीय कारणांमुळे तपासणी प्रक्रिया रखडल्याची बाब खा.सोनवणे यांनी निवेदनात नमूद केली आहे. येथेच तपासणी सुरू केल्यास भाविकांना मोठा दिलासा मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.हज यात्रेची वैद्यकीय तपासणी ठरावीक कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असून विलंब झाल्यास अनेक भाविक यात्रेपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यास तातडीने ऑनलाईन नोंदणीसाठी आवश्यक आयडी व पासवर्ड स्वारातीला उपलब्ध करून देण्यात यावेत तसेच अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पूर्ववत पद्धतीने तपासणी सुरू करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

# संपादकीय

## चोरीचा मामला



भारतीय दंड संहितेच्या कलम ३७८ नुसार चोरी म्हणजेच, वस्तू पळविण्याचा एक गंभीर गुन्हा आहे. एखाद्याच्या संमतीशिवाय त्याची वस्तू किंवा जंगम मालमत्ता गैरमार्गाने काढून घेण्याची केलेली कृती हे चोरीच्या गुन्ह्यांचे स्वरूप मानले जाते. चोरीसाठी ३ वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा असल्याने आजही समाजात चोरीच्या गुन्ह्यांतील आरोपीपासून सावध राहण्याचा सल्ला दिला जातो. इंटरनेटच्या जमान्यात आता चोरीच्या व्याख्येत थोडी भर पडली आहे ती, माहिती चोराची! माहिती चोरीचे गुन्हे संबंधित कंपन्या करत असतील, तर लोकांनी विश्वास कोणावर ठेवायचा? एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान 'डेटा शेअरिंग'च्या नांवाखाली वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे उल्लंघन करण्यावरून व्हॉट्सप आणि मेटा या कंपनीला सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांत फटकारल्याने माहिती चोरीच्या गुन्ह्याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष गेले आहे. नागरिकांच्या मूलभूत गोपनीयतेच्या अधिकाराशी खेळू नका, असा सज्जड दम न्यायालयाने दिला. असे गुन्हे पुन्हा घडणार नाही अशी लेखी हमी संबंधित कंपनीने द्यावी,असे निर्देशही खंडपीठाने दिले. अलीकडच्या काळात एआयच्या माध्यमातून आणखी एक माहिती चोरीचा प्रकार उजेडात आला होता. जगभरात एआयचा वापर जसा झपाट्याने वाढतो आहे, तसे त्यातील धोकेही समोर येत आहेत. त्यामुळे एलन मस्क यांच्या एआय कंपनीचा चॅटबॉट ग्रोक वादात सापडला होता. यापूर्वी ग्रोक एआयने काही यूजर्ससोबत चुकीची भाषा वापरल्याच्या तक्रारी आल्यानंतर मस्क यांनी माफी मागितली होती. आता हा चॅटबॉट सामान्य लोकांच्या घराचे पत्ते, संपर्क क्रमांक आणि कुटुंबांची माहिती शेअर करत असल्याचे उघड झाले आहे. कोणत्याही व्यक्तीचा त्याच्या संमतीशिवाय डेटा सहज उपलब्ध केला जात असेल तर, ते अतिशय गंभीर आहे. त्यातून यूजर्ससोबत अनेक गैरव्यवहार झाल्याचे प्रकार होत असल्याचे उघडकीस येत आहे.सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात नेमके काय झाले. मेटा आणि व्हॉट्सअॅपवर त्यांच्या गोपनीयता धोरणांसाठी अपिलीय न्यायाधिकरणाने २०२१ मध्ये ठोठावलेला २१३ कोटी रुपयांचा दंड सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवत या कंपन्यांची कानउघडणी केली. 'डेटा शेअरिगच्या नावाखाली तुम्ही लोकांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करू शकत नाही. जर तुम्ही नियम आणि कायदे पाळू शकत नसाल, तर देश सोडून जा' अशा शब्दांत न्यायालयाने ताशेरे ओढले. सर्वसामान्यांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या कंपन्यांना वठणीवर आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केलेला प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. व्हॉट्सअॅपच्या डेटा शेअरिंगच्या अटींवर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गोपनीयतेच्या अटी इतक्या हुशारीने तयार केल्या आहेत की, सामान्य माणसाला त्या समजू शकत नाहीत. लोकांची वैयक्तिक माहिती चोरण्याचा हा चांगला मार्ग कंपन्यांनी शोधला असला तरी न्यायालय हे होऊ देणार नाही, असे मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने बजावले. सामान्य वापरकर्त्यांना समजणार नाही, असे क्लिष्ट गोपनीयता धोरण तयार करून कंपन्या माहिती गोळा करतात .'डेटा शेअरिंग' हा खासगी माहितीची चोरी करण्याचा एक मार्ग आहे. डिजिटल युगात हे प्रकरण वापरकर्त्यांचा डेटा किती असुरक्षित आहे, हे दर्शवते याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीबरोबरच उद्योगधंद्यासाठी 'डेटा' ही सर्वात मौल्यवान संपत्तींपैकी एक आहे. म्हणून, तो चोरण्याचे प्रकार सर्रास होऊ लागले आहेत. डेटा चोरी म्हणजे काय ? तर, डिजिटल स्वरूपात संग्रहित केलेली संवेदनशील माहिती अनधिकृतपणे मिळवणे, कॉपी करणे किंवा बाहेर काढणे. ती मिळविण्यासाठी, अपप्रवृत्तीच्या व्यक्ती त्यांच्याकडे असलेल्या विशेषाधिकारांचा गैरवापर करतात किंवा संगणक प्रणाली, नेटवर्क किंवा डिजिटल स्टोरेज उपकरणांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी इतर मार्गांचा वापर करतात, हे सर्वोच्च न्यायालयातील ताज्या प्रकरणावरून पुन्हा एकदा जनतेच्या लक्षात आले आहे.पूर्वी मुलाला समजायला-उमजायला लागल्यानंतर सातव्या वर्षी शाळेत प्रवेश दिला जात असे. आताची पिढीही प्रगत पाहायला मिळते. मोबाइल फोन हाताळणे हा तीन वर्षांच्या मुलाला नुसते जमत नाही, तर सोशल मिडीयावरील अनेक ॲपची नावेही त्याला ठाऊक आहेत. नोकरी धंद्यांच्या ठिकाणी व्हॉट्सअॅपचा वापर सर्रास केला जातो. सोशल मीडियाशी संबंध नसलेली व्यक्ती म्हणजे तिला जगाशी त्याचे देणेघेणे नाही असा समज करून दिला जातो. सोशल मीडिया, मोबाइल, इंटरनेट हे शब्द आपल्या आयुष्याशी अभिन्न जोडले गेले आहेत. त्यामुळे या सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली वैयक्तिक गोपनीय माहितीही जर चोरी होत असेल, तर विश्वास कोणावर ठेवायचा ? असा प्रश्न प्रत्येकांच्या मनात येऊ शकतो. चोरी केलेला डेटा, बँक खात्याची माहिती, ऑनलाइन पासवर्ड, पासपोर्ट क्रमांक, ड्रायव्हिंग लायसन क्रमांक, सामाजिक सुरक्षा क्रमांक, ऑनलाइन सदस्यता इत्यादींपैकी काहीही असू शकतो. जर एखाद्या अनधिकृत व्यक्तीला वैयक्तिक किंवा आर्थिक माहितीमध्ये प्रवेश मिळाला, की मालकाच्या परवानगीशिवाय ती हटवू शकतात, बदलू शकतात, याला 'माहिती चोरी' असे आपण म्हणतो. ग्राहकांच्या नोंदीतून चोरीचे प्रकार घडू शकतात. क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड माहितीसारखा आर्थिक डेटा, सोर्स कोड, मालकी प्रक्रियेचे वर्णन आणि ऑपरेटिंग पद्धती, एचआर रेकॉर्ड आणि कर्मचारी डेटा, संगणकावर साठवलेल्या खासगी कागदपत्रांचा वापर केला जाऊ शकतो. जेव्हा संवेदनशील डेटा चुकून इंटरनेटवर किंवा हरवलेल्या हार्ड ड्राइव्ह किंवा उपकरणांद्वारे उघड होतो तेव्हा डेटा लीक होतो. यामुळे सायबर गुन्हेगारांना त्यांच्याकडून कोणत्याही प्रयत्नांशिवाय संवेदनशील डेटावर अनधिकृत प्रवेश मिळतो. एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने साठवलेली कोणतीही माहिती डेटा चोरांसाठी संभाव्य लक्ष्य असू शकते. यापुढे ॲपच्या कंपन्यांनी पापाचे वाटेकरी होऊ नये, एवढीच अपेक्षा सर्वसामान्य वापरकर्ता करतो आहेत.

# स्थानिक तलाठी, मंडळाधिकारी यांच्या केज तालुक्याबाहेर बदल्या करा तसेच त्यांचा पदभार बाहेरील तलाठी, मंडळाधिकारी यांचेकडे द्या! क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांची निवेदनाद्वारे मागणी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात सध्या स्थानिक रहिवासी असलेले तलाठी(ग्राम महसूल अधिकारी), मंडळ अधिकारी महसूल मंडळात ,सज्जांवर शासकीय कर्तव्यावर असून त्यांच्याकडून दैनंदिन कामकाज करताना नेहमीच पक्षपातीपणा होत असल्याचे निदर्शनास येत आहे.ठराविक राजकीय नेत्यांच्या सांगण्यावरून स्थानिक तलाठी व मंडळ अधिकारी हेतू परस्पर चुकीचे व भ्रष्ट काम करताना अनेकदा स्पष्ट झाले आहे.यामुळे शेतकऱ्यांचे,सामान्य नागरिकांचे,पक्षकारांचे,कायदेशीर,सामाजिक, मानसिक,आर्थिक नुकसान होत असून यापुढे केज तालुक्यातील स्थानिक रहिवासी असणाऱ्या सर्वच ग्राम महसूल अधिकाऱ्यांची व मंडळाधिकाऱ्यांची केज तालुक्याबाहेर तात्काळ बदल्या कराव्यात तसेच त्यांच्याकडील सध्याचा पदभार उपलब्ध असणाऱ्या बाहेर जिल्ह्यातील रहिवासी असणारे ग्राममहसूल अधिकाऱ्यांकडे व मंडळाधिकारी यांचेकडे सोपवण्याची मागणी सोमवारी दि.९ फेब्रुवारी रोजी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड




जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार केज यांच्याकडे केली आहे.निवेदनात त्यांनी असे नमुद केले की,पुन्हा याच स्थानिक तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) व मंडळाधिकारी यांचेकडे केज शहर,व केज तालुक्यातील ग्रामीण भागातील महसूल मंडळातील सज्जांचा पदभार दिला तर बीड जिल्हा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने बेमुदत व तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# वनवा रोखा, जंगले वाचवा' ; तळोदा येथे वन विभागाची विशेष कार्यशाळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

वने ही आपली राष्ट्रीय संपत्ती असून त्यांचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. १ ते ७ फेब्रुवारी दरम्यान साजऱ्या होणाऱ्या 'वन वनवा सप्ताह' उपक्रमाचे औचित्य साधून तळोदा वनपरिक्षेत्रामार्फत वनवा व्यवस्थापन व नियंत्रण कार्यशाळा उत्साहात पार पडली. तळोदा वन विश्रामगृह परिसरात आयोजित या कार्यशाळेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जंगले सुरक्षित ठेवण्याचा संकल्प करण्यात आला.

मेवासी वनविभागाचे सहाय्यक वनसंरक्षक अमोल आडे यांनी यावेळी मेवासी वनक्षेत्रात मागील तीन वर्षांत घडलेल्या वनव्यांच्या घटनांचा तांत्रिक आढावा सादर केला. भविष्यात अशा



घटना रोखण्यासाठी 'फायर अलर्ट सिस्टीम' चा प्रभावी वापर आणि तातडीचा प्रतिसाद देण्याचे प्रशिक्षण वनकर्मचाऱ्यांना देण्यात आले. वनवा लागल्यास तो विझवण्यापेक्षा तो लागूच नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर यावेळी सखोल चर्चा करण्यात आली.

वने वाचवण्यासाठी केवळ वन विभाग पुरेसा नसून, स्थानिक नागरिक आणि संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे. नागरिकांमध्ये वनव्याबाबत जनजागृती करणे आणि लोकसहभागातून वन संरक्षणाची चळवळ उभी करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

सदर कार्यशाळा उपवनसंरक्षक सुहास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी तळोदा वनपरिक्षेत्र अधिकारी शंतनु सोनवणे, अक्कलकुवा व खापरचे वनपरिक्षेत्र अधिकारी ललित गवळी, रोहयोचे वनपरिक्षेत्र अधिकारी वसंत गावित, परिविक्षाधीन वनपरिक्षेत्राधिकारी कोमल सोनवणे, तसेच राजेश अंधारे आणि रजनी पाटील उपस्थित होते. तळोदा, अक्कलकुवा व खापर क्षेत्रातील वनपाल आणि वनरक्षकांनी या प्रशिक्षणात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# नंदुरबारच्या उद्योजकतेची हैदराबादमध्ये 'धूम' ; राष्ट्रीय येसमिट मध्ये तीन उद्योजकांनी पटकावले विजेतेपद

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

ग्रामीण आणि आदिवासी भागातील कल्पकता जेव्हा राष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचते, तेव्हा यशाची शिखरं कशी सर होतात, याचा प्रत्यय नुकताच हैदराबाद येथे आला. ५ ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पार पडलेल्या ९ व्या 'नॅशनल येसमिट' मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील २७ उद्योजकांनी आपला ठसा उमटवला असून, बिझनेस पिचिंग स्पर्धेत जिल्ह्याच्या तीन सुपुत्रांनी राष्ट्रीय विजेतेपद पटकावून जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते उद्घाटन.

Youthaid Foundation, YEFi आणि National Institute of MSME यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या भव्य परिषदेचे उद्घाटन नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना त्यांनी देशातील २० राज्यांतून आलेल्या ६०० हून अधिक तरुणांना 'आत्मनिर्भरते'चा मंत्र दिला. युवकांनी केवळ




नोकरी शोधणारे न बनता नोकरी देणारे बनावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**नंदुरबारच्या उत्पादनांचे विशेष आकर्षण:**-या परिषदेत नंदुरबारसाठी स्वतंत्र दालन उपलब्ध करून देण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने खालील उत्पादनांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले: आरोग्यदायी उत्पादने: मोहा लाडू, रागी (नाचणी) लाडू, मशरूम आणि मिलेट चार्ट. पारंपारिक मसाले: शुद्ध हळद आणि मिरची पावडर. नाविन्यपूर्ण संकल्पना: पुरणपोळी रिमिक्स, झिरो वेस्ट फूड मॉडेल आणि वेद ऊर्जा हेअर ऑइल. परिषदेचा मुख्य आकर्षण असलेल्या 'बिझनेस पिचिंग' स्पर्धेत नंदुरबारच्या १५ उद्योजकांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत फूड प्रोसेसिंग क्षेत्रात उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल खालील तिघांची राष्ट्रीय विजेते म्हणून निवड करण्यात आली:

मयुरी राजेश निकुंबे (मयुरी मिलेट्स - रागी लड्डू)
वैभव रघुवंशी (श्री बद्रीकेदार प्रा. लि.)
विशाल माधव वसावे (विशाल ट्रायबल पावडर)

या यशामागे नंदुरबार जिल्हा प्रशासन, कृषी विज्ञान केंद्र, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) आणि निती आयोग यांचे विशेष सहकार्य लाभले. जिल्हा समन्वयक शिवाजी परमार आणि निती फेलो वैष्णवी रामदोहकर यांच्या नेतृत्वाखालील टीमने या सर्व उद्योजकांना राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. नॅशनल येसमिटमधील हे यश केवळ या उद्योजकांचे नसून, नंदुरबारच्या दुर्गम भागातील आर्थिक क्रांतीचे प्रतीक आहे. यामुळे आगामी काळात जिल्ह्यातील स्टार्टअप संस्कृतीला मोठी चालना मिळणार आहे.

# नूतनीकरण केलेल्या उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

## प्रशासकीय कामांना मिळणार गती; अत्याधुनिक सोयी-सुविधांनी कार्यालय सज्ज

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

प्रशासकीय कार्यपद्धती अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने नंदुरबार येथील नूतनीकरण करण्यात आलेल्या उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे भव्य उद्घाटन मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडले. जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या शुभहस्ते या नूतनीकरण केलेल्या वास्तूचे फित कापून लोकार्पण करण्यात आले.

या सोहळ्याप्रसंगी व्यासपीठावर उपविभागीय अधिकारी अंजली शर्मा, उपविभागीय अधिकारी अनय नावंदर यांच्यासह महसूल व विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नूतनीकरण करण्यात आलेले हे कार्यालय आता पूर्णतः बदललेल्या स्वरूपात नागरिकांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहे.

यामध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज



कार्यक्षेत्र. कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसाठी बसण्याची उत्तम सोय आणि माहिती कक्ष.प्रशासकीय कामात सुलभता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.अशा सोयी उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

उद्घाटन प्रसंगी बोलताना प्रशासकीय सूत्रांनी विश्वास व्यक्त केला की, नवीन कार्यालयीन रचनेमुळे केवळ कामाचा वेगच वाढणार नाही, तर नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अधिक जलद आणि कार्यक्षम पद्धतीने उपलब्ध होतील. यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

हे नूतनीकरण केलेले कार्यालय म्हणजे केवळ एक इमारत नसून, 'सुशासना'कडे टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. लोकांच्या समस्यांचे निराकरण आता अधिक प्रभावीपणे होईल.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपविभागीय कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या नवीन बदलामुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# केवळ पैसा कमावणारा व्यक्ती न होता जबाबदार नागरिक बना-सपोनि सुभाष सानप

## तुलसी व माता रमाई नर्सिंग तसेच ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

आजचा विद्यार्थी हा उद्याचा समाज घडवणारा नागरिक असल्याने केवळ पैसा कमावणारी व्यक्ती होण्यापेक्षा समाजासाठी उपयुक्त व जबाबदार नागरिक बनणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन बीड वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी केले.तुलसी शैक्षणिक समूह संचालित तुलसी नर्सिंग कॉलेज, माता रमाई नर्सिंग कॉलेज व तुलसी ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस हवालदार त्रिंबक कुडके, प्रा.अर्जुन राठोड, डॉ.सुनील जोंधळे, प्रा.राम गायकवाड, प्रा.शरद वंजारे, प्रा.डी.जी.निकाळजे, प्रा.डी.डी.राऊत तसेच प्रा.प्रकाश ढोकणे उपस्थित होते.यावेळी सुभाष सानप म्हणाले की, विद्यार्थी वर्षभर अभ्यासाच्या ताणतणावात व्यस्त असतात. स्नेहसंमेलनासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण मिळते तसेच विद्यार्थ्यांमध्ये परस्पर ओळख वाढून प्राध्यापक व विद्यार्थ्यांमधील संवाद अधिक दृढ होतो. विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना एकमेकांचे गुण आत्मसात करण्याची संधी मिळते, असे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले की, आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे शिल्पकार आहेत. महाविद्यालयाचे उद्दिष्ट केवळ पदवी प्रदान करणे नसून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक ठिकाणी पारंपरिक शिक्षणपद्धतीवर भर दिला जात असताना आपल्या संस्थेत नाविन्यपूर्ण




उपक्रम राबवले जात असून त्याचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ होत आहे. बदलत्या काळानुसार रटाळ शिक्षणापेक्षा नवीन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.तसेच विद्यार्थ्यांनी अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, वेळेचे नियोजन आणि दृढ इच्छाशक्ती यांच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, असा प्रेरणादायी संदेश दिला. जगात बदल घडवायचा असेल तर त्याची सुरुवात स्वतःपासून करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. प्राचार्य डी.डी.राऊत यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. यावेळी शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.लावणी,आदिवासी व कोळीगीत तसेच देशभक्तीपर गीतांवरील नृत्य सादरीकरणांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. विविध सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलागुणांचे उत्कृष्ट दर्शन घडवले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# मोडकळीस आलेले जाळे आणि ३३ ग्राहकांचा टेकू; बोरद उपकार्यालयाची अवस्था बिकट!

## सरकारी सेवा 'सुस्त', खाजगी 'मस्त'; बी एस एन एल च्या ढिसाळ कारभाराला कंटाळून ग्राहक 'एअर फायबर'च्या आश्रयाला!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

डिजिटल इंडियाच्या गप्पा मारणाऱ्या प्रशासनाला जमिनीवरची वस्तुस्थिती बोरद (ता. तळोदा) येथे पाहायला मिळत आहे. एकेकाळी संवादाची 'लाईफलाईन' समजल्या जाणाऱ्या बीएसएनएलने आपल्याच ग्राहकांचा विश्वास गमावला असून, बोरद परिसरातील टेलिफोन सेवा आता शेवटच्या घटका मोजत आहे. तक्रार करूनही कर्मचारी फिरकत नसल्याने संतप्त ग्राहकांनी आपले लँडलाईन फोन फेकून न देता थेट तळोदा कार्यालयात जमा करून बीएसएनएलचा 'बोरियाबिस्तर' आवरला आहे.

खाजगी कंपन्यांची 'एअर स्ट्राईक', बी एस एन एल फक्त बघत राहिली!

जगासोबत चालण्यासाठी बीएसएनएलने 'तरंग' सेवा आणली, पण ती तरंगासारखीच हवेत विरली. आता ऑप्टिकल फायबरच्या नावाखाली जुन्याच बाटलीत नवीन मद्य




भरण्याचा प्रकार सुरू असल्याची चर्चा ग्राहकांमध्ये आहे. अवघ्या ३३ कनेक्शन्सवर हे उपकार्यालय तग धरून आहे. त्याउलट खाजगी कंपन्यांचे 'एअर फायबर' सुसाट वेगाने चालत असल्याने, ग्राहकांनी सरकारी 'कासव'गती सेवेला कायमचा रामराम ठोकला आहे.

**अभियंत्यांची 'सावरासावर' पण ग्राहकांचा 'नकार'!**

तळोदा कार्यालयाचे कार्यकारी अभियंता विकास महावर हे ग्राहकांना विश्वासाचे आवाहन करत असले, तरी दोन दिवसात न सुधरणारे फोन आणि वारंवार खंडित होणारे इंटरनेट यांमुळे ग्राहकांचा संयम सुटला आहे. आता फक्त विश्वास नको, तर ठोस सेवा द्या, अन्यथा उरले सुरले ३३ ग्राहकही पाय काढतील, असा इशारा बोरद परिसरातील नागरिकांनी दिला आहे

## सावलीत अवैध दारू वाहतुकीचा मोठा पर्दाफाश

# LCB ची धडक कारवाई; १५.९४ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । सिद्धेश्वर केंद्रे**

सावली पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या देशी व विदेशी दारूची साठवणूक, विक्री व वाहतूक करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखा (LCB) चंद्रपूरच्या पथकाने धडक कारवाई करत तब्बल १५ लाख ९४ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई ७ फेब्रुवारी २०२६ रोजी गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.

व्याहाड बुद्रुक येथील महेश गड्डम हा आरोपी आपल्या परिणीती ट्रान्सपोर्ट – एक्वा चिल्ड वॉटर नावाच्या ऑफिस व गोडाऊनमधून लाल रंगाच्या हुंडाई क्रेटा कारद्वारे देशी–विदेशी दारूची अवैध वाहतूक व विक्री करणार असल्याची माहिती LCB पथकाला मिळाली होती.

त्या माहितीच्या आधारे LCB पथकाने सापळा रचून सदर कार, ऑफिस व गोडाऊनची पंचासमक्ष तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात अवैध दारू व अन्य साहित्य आढळून आले. यामध्ये ९० मि.ली. क्षमतेच्या देशी दारूच्या ३,८०० बाटल्या (किंमत अंदाजे १,५२,०००), रॉयल स्ट्रॉंग विदेशी दारूच्या १८० मि.ली.च्या ३८४ बाटल्या (मध्यप्रदेश – ९९,८४०), ९६ बाटल्या (महाराष्ट्र – २४,१४४), हवर्ड्स ५००० कंपनीच्या ५०० मि.ली.च्या केन (१८,७२०), दुकानाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली २,९५,४१० रोख रक्कम, सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर (५,०००) तसेच हुंडाई क्रेटा कार क्र. MH-40-AR-2365 (१० लाख) असा एकूण १५,९४,९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी आरोपीविरुद्ध सावली पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सावली पोलीस करीत आहेत.ही संपूर्ण कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे व उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनाखाली डउइ चे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूरच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली



# पत्रकार दत्ता खंदारे समाज रत्न पुरस्काराने सन्मानित!

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

समाजरत्न पुरस्कार हाविविध सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रदान करण्यात येणारा एक प्रतिष्ठित सन्मान आहे.असाच एक पुरस्कार पत्रकारिता क्षेत्रात गेल्या ३० वर्षांपासून कार्यरत असणारे पाक्षिक धारावी वार्ता १५वर्ष यशस्वीरित्या चालवून जनतेच्या समस्या सोडविणारे,साप्ताहिक भगवे वादळचे संपादक,उत्कृष्ट पत्रलेखक, स्तंभलेखक श्री दत्ता खंदारे यांना सृष्टी संस्थां प्रायोजित आम्ही वडाळा पूर्वकरच्या८ व्या वर्धापनदिनी ८फेब्रुवारी २०२६ रोजी मान्यवर व्यक्तीच्या हस्ते समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.पुरस्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून दत्ताराम दळवी( माजी अध्यक्ष मुंबई वृत्तपत्र लेखक संघ),भाऊ सावंत,( अध्यक्ष हुतात्मा स्मारक कमिटी),असुंता डिसोझा( सामाजिक कार्यकर्त्या),हेमलता




सदाशिवम( सामाजिक कार्यकर्त्या),युसूफ दरबार,( जेष्ठ संगीतकार ब्यांजो वादक),सुधाकर काश्यप्य ( जेष्ठ पत्रकार),आनंद प्रभू ( जेष्ठ मनसे नेते)सुनील शिंदै ( जेष्ठ पत्रकार),भगवान भुसारा ( मुख्याध्यापक ) सुफियान वनू( माजी नगरसेवक ) उपस्थित होते.

# बीड जि प साठी भाजपची रणनीती ठरली पंकजाताईंची बदामराव पंडितांनी घेतली भेट

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेसह गेवराई पंचायत समितीची लवकरच निवडणूक जाहीर होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजपा युवानेते युधाजित पंडित यांनी मुंबई येथे राज्याच्या ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजाताई मुंडे यांची रामटेक येथे जाऊन भेट घेतली. यावेळी गेवराई तालुक्यातील जि प आणि पं स च्या निवडणुकी संदर्भात सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. गेवराई तालुक्यात माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि युवा नेते बाळराजे पवार यांनी भाजपा मध्ये एकत्रितपणे काम करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, पहिल्याच झालेल्या गेवराई नगर परिषदच्या निवडणुकीत घवघवीत यश




मिळवत भाजपने एक हाती झेंडा फडकवला आहे. आता होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. त्याबाबत रणनीती ठरवण्यासाठी आणि गेवराई मतदार संघातील विविध विकास कामांच्या नियोजनासाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथे जाऊन राज्याच्या ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या रामटेक या निवासस्थानी भेट घेतली. त्यांच्या समवेत माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, माजी जि प सदस्य श्यामराव राठोड यांची उपस्थिती होती. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश मिळाल्याबद्दल ना पंकजाताई मुंडे यांचे माजी मंत्री बदामराव पंडित आणि माजी सभापती युधाजित पंडित यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी निवडणुकीसह विविध विषयांवर सविस्तर सकारात्मक चर्चा झाल्याचे समजते.

# बदामराव पंडित यांच्या प्रयत्नाला यश ;अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाला मान्यता;गेवराई कोर्टाची इमारत होणार दुमजली

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य नागरिक पक्षकारांना सुलभ सत्वर, तत्पर, अत्यल्प त्रासात व अत्यल्प खर्चात न्याय मिळावा यासाठी गेवराई येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची नव्याने स्थापना करून कोर्टाची इमारत दुमजली करण्याची मागणी भाजपाने ते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या मागणीला यश आले असून गेवराई जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयाची स्थापना करण्याची मान्यता मिळाली आहे. आता लवकरच कोर्टाची इमारत दुमजली होणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन, बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालय प्रलंबित असलेली गेवराई तालुक्यातील दिवाणी स्वरूपाची सर्व प्रकारची व फौजदारी स्वरूपाची सर्व प्रकारची मिळून अंदाजे ५०० पेक्षा जास्त प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याचे म्हटले होते. गेवराई तालुक्यातील बहुतांश गावे बीड न्यायालयात असून अंदाजे १२० ते १३० किलोमीटर अंतरावर वसलेली आहेत. त्यामुळे पक्षकारांना बीड येथे जाण्या येण्यासाठी अत्यंत त्रासदायक, गैरसोयीचे, खर्चिक व असुविधायुक्त होत आहे. त्यामुळे न्याय मिळवताना पक्षकाराचे अत्यंत गैरसोय होत आहे. न्यायालयीन कामासाठीही त्यांना वेळेवर पोहोचता येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होऊन पक्षकारांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो व वेळप्रसंगी अधिकचा दंड सहन करावा लागतो असे सांगून, गेवराई तालुक्यातील पक्षकारांना सुलभ, सत्वर, तत्पर, अत्यल्प त्रासात व अत्यल्प खर्चात न्याय देण्यासाठी



गेवराई येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करावे अशी मागणी केली होती. याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ दखल घेतली. दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी कक्षा अधिकारी महाराष्ट्र शासन सुनील आखरे यांनी प्रबंधक निरीक्षणे-२, मा उच्च न्यायालय मुंबई यांना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्राचा संदर्भ देऊन गेवराई येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करणे बाबत मागणी कळवली होती. या अनुषंगाने दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी आनंद एल. यावलकर, प्रधान जिल्हा न्यायाधीश बीड यांनी गेवराई येथे जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयाची स्थापना करणे बाबत माननीय उच्च न्यायालयाचे पत्र क्रमांक इ (थ)--१२०२, दिनांक ३० जानेवारी २०२६, २०१४/२९३/६०३६ द्वारे गेवराई जिल्हा बीड येथे नवीन जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांचे न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव तत्वतः स्वीकारला आहे. ११६८ प्रकरणांची पुरेशी प्रलंबितता लक्षात घेता न्यायालयीन इमारत आणि न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासाठी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी निवासी निवासस्थान बांधण्याच्या आधीन असल्याचे म्हटले आहे.माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या प्रयत्नामुळेप यापूर्वीच गेवराई येथे कोर्टाची फर्निचर सह भव्य इमारत उभा राहिलेली आहे. आता या नव्या आदेशामुळे हीच कोर्ट इमारत लवकरच दुमजली होणार आहे. यामुळे गेवराईतील सर्व वकील बांधवांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचे आभार मानले आहेत.

# मानवी जीवनात अध्यात्म मन:शांती देते तर विज्ञान प्रगती देते मठाधीपती ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री वरपगावकर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

मानवी जीवनात प्रत्येक गोष्टीला आपले महत्व आहे.धावपळीच्या जगात मनःशांती महत्वाची आहे. विज्ञानाची प्रगती शांती देऊ शकणार नाही, त्यासाठी अध्यात्माची गरज आहे.त्याचवेळी मन शांती देणारे अध्यात्म प्रगतीची अपेक्षा पूर्ण करू शकत नाही त्यासाठी विज्ञानाची जोड गरजेची आहे.त्यासाठी आयुष्यात अध्यात्म आणिविज्ञानाची सांगड घालून चालणे गरजेचे आहे.शिवराम पुरी मठ संस्थान भक्तांच्या सेवेत सदैव कार्य करत राहील असे प्रतिपादन शिवराम पुरी मठ संस्थान वरपगावचे मठाधिपती ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री यांनी काल्याच्या किर्तन प्रसंगी व्यक्त केले.केज तालुक्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले वरपगावचे शिवरामपुरी मठसंस्थान या भागातील लोकांचे प्रेरणास्थान असून या मठसंस्थांनाने गेली साडेतीनशे वर्षे केलेली समाजाची अद्यात्मिक सेवा भूषणीय असून गेली सहा-सात दशकात मठाधीपती वै. नागेश पुरी महाराज व त्यानंतर वै.रामकृष्ण पुरी महाराज यांनीअध्यात्मिक प्रबोधनाद्वारे मोठे कार्य करून संस्थांनाचे नांव महाराष्ट्राच्या कानकोपऱ्यात पोहोंचवले आहे असे गौरवौद्गागार केज विधानसभेच्या आमदार नमितताई मुंदडा यांनी येथील सप्ताह समारोपाच्या वेळी बोलताना व्यक्त केले.केज तालुक्यातील वरपगांव येथे शिवराम पुरी मठ संस्थानात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रामकृष्ण महाराज स्मृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.याही वर्षी दि.३१ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान साप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.सात दिवस दररोज सायंकाळी ७ते ९ यावेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा पार पडली.सात दिवस दररोज दुपारी २ ते ५ यावेळेत शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. दररोज दुपारी व सायंकाळी उपस्थित भक्तांसाठी येथे अन्नदानाची व्यवस्था मठ संस्थान व वेगवेगळे अन्न दाते यांच्या वतीने करण्यात आली होती.दि.७ फेब्रुवारी रोजी सप्ताहाची सांगता मठ संस्थांनाचे विद्यमान मठाधीपती महंत ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री वरपगांवकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.यावेळी अनेक महाराज सह आमदार नमिताताई मुंदडा यांच्यासह शिवसेना उबाठा गटाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे,राहुल सोनवणे,ऋषिकेश आडसकर,विजयप्रकाश ठोंबरे रत्नाकर शिंदे, सौरभ सोनवणे,सुनील गलांडे,किसनदादा कदम, विष्णू भाऊ घुले, दादासाहेब ससाणे, पृथ्वीराज पाटील, प्रवीणकुमार शेप यांची उपस्थिती होती. मान्यवरांचा मठ संस्थांनच्या वतीने सत्कार करण्यात आला.कार्यक्रमा नंतर उपस्थित लाखो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.संस्थानाच्या वतीने सर्व ती अत्यावश्यक व्यवस्था करण्यात आली होती.

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी शुभेच्छा संदेश पाठवला होता.आपल्या शुभेच्छा संदेशात त्यांनी केज तालुक्यातील वरपगाव च्या मठ संस्थांनाचे कार्य खुप मोठे आहे.केवळ झगमगाट न करता अत्यंत पवित्र अध्यात्मिकप्रबोधन सेवेचे कार्य मठ संस्थान करत आहे.इच्छा असूनही आपण कार्यक्रमाला पोहोचू शकलो नाही मात्र लवकरच मठ संस्थांनाला भेट देणार आहे असे जरांगे पाटील म्हणाले. रामकृष्ण महाराज याच्या जयजयकाराने वरपगाव नगरी दुमदुमली होती. नंतर अनेकांनी महा प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी व्यापारी बांधवांनी अनेकानी आपले दुकाने थाटली होती.एस टी महामंडळाने बसेसची सोय केली होती.यावेळी भाविक भक्तांचा महापुर दिसुन आला.त्यानंतर दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांनी हा परीसर स्वच्छता करून नवीन संदेश दिला आहे.



# साळेगाव त्यागमूर्ती माता रमाई जयंती साजरी



दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील साळेगाव येथे त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.दि. ७ फेब्रुवारी रोजी साळेगाव ता. केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहचारिणी त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती साजरी करण्यात आली. सायंकाळी ७:०० वाजता गावातील प्रमुख मार्गावरून माता रमाई यांच्या प्रतिमेची वाद्यांच्या गजरात सजवलेल्या आकर्षक रथातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब बांगर, पोलिस हवालदार गोविंद मुंडे, माजी व्हाइस चेअरमन शंभू सरवदे, माजी व्हॉईस चेअरमन लिंबाजी बचुटे, ज्योतिराम बचुटे, रवींद्र जोगदंड, महादेव गायकवाड, रतन बचुटे, बाळासाहेब बचुटे, ग्रामपंचायत सदस्य रेखा सरवदे, जालिंदर राऊत, रत्नाकर राऊत, महादेव सरवदे, वाल्मीक सरवदे, रामा गायकवाड, रवी गायकवाड हे होते. जयंती यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीचे अध्यक्ष रोशन सरवदे, रोहन बचुटे, प्रतिक जोगदंड, अक्षय सरवदे, पोपट बचुटे, अजय बचुटे, अमित बचुटे, विशाल बचुटे, रवी बचुटे यांनी परिश्रम घेतले.

# चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चिंचोली माळी या पतसंस्थेची सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधी करिता नव निर्वाचित संचालका मधून प्राधिकृत निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती वहावळे एम.एस यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळ,चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची बिनविरोध निवड यशस्वीरित्या पार पडली.संस्थेचा योग्य रितीने आर्थिक कारभार सुरळीत चालूअसल्यामुळे संस्थेने अनावश्यक खर्च टाळून निवडणूक बिन विरोध करण्यात आली. चेअरमनपदी श्री.फाटक गणेश सखाहरी तसेच व्हाईस चेअरमनपदी श्री. कांबळे दत्तात्रय हरिकिशन यांची सन २०२६-२०३१ या कालावधी करता निवड करण्यात आली.याप्रसंगी संस्थेचे संस्थापक श्री. नंदकिशोर इंगळे यांनी ग्रामीण भागातील व्यक्तींना काटकसर करून बचतीची ची सवय लावणे व ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्ती आर्थिक साक्षर करणे या उद्देशाने संस्थेची निर्मिती व संस्थेचे आर्थिक हित लक्षात घेऊन सदरची निवडणूक बिनविरोध केल्याचे सांगितले तसेच खोडसे सी.ए.प्रमाणित लेखा परीक्षक यांनी ठेवी सुरक्षितता,वैधानिक कर्ज प्रकरणी बाबत घ्यावयाची दक्षता,तसेच संचालक ठेव ठेवण्याबाबत मार्गदर्शक अशा सूचना देऊन संस्थेच्या आर्थिक यशस्वी वाटचालीसाठी व नवनिर्वाचित संचालकाचे पदाधिकाऱ्याचे मनःपूर्वक शुभेच्छा देऊन यशस्वी रित्या आर्थिक कामकाज करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या तसेच निवडणूक अधिकारी श्रीमती वहावळे एम.एस. यांनी संस्थेने अनावश्यक खर्च टाळून बिनविरोध निवडणूक झाल्यामुळे सदर संस्थेचे कौतुक करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.तसेच नव निर्वाचित पदाधिकाऱ्याचे व मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.समारोप प्रसंगी उपस्थित सर्व नवनिर्वाचित संचालक १. श्री.नंदकिशोर शहाजीराव इंगळे २.श्री.अशोक निवृत्ती बर्डे ३.श्री.रामदास हरिदास सपाटे ४.श्री. विलास अशोकराव पवार ५.श्री.निखिल नंदकिशोर इंगळे ६.शशिकांत शहाजीराव इंगळे ७. श्रीमती सारिका नंदकिशोर इंगळे ८. श्रीमती आशा महारुद्र सारूक ९.श्रीमती सुनीता शशिकांत इंगळे तसेच या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित गावातील जेष्ठ मंडळी श्री.ज्ञानोबा श्रीपती सारुक,श्री हरी किशन लक्ष्मण कांबळे, श्री.बोराडे,श्री.गव्हाणे कर्मचारी वर्ग उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन श्री.खोडसे साहेब यांनी केले व आभार प्रदर्शन संस्थेचे व्यवस्थापक श्री विनायक पाळवदे यांनी केले.संस्थेचा कर्मचारी वर्ग यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

# बीडमध्ये 'शिव महापुराण कथा ज्ञान यज्ञ' सोहळ्याचा शुभारंभ; भाविकांची मोठी गर्दी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**




रामकृष्ण नगर येथील भगवान रामेश्वर शिव महादेव मंदिर वर्धापन दिन आणि आगामी महाशिवरात्री उत्सवाचे औचित्य साधून 'शिव महापुराण कथा ज्ञान यज्ञ' सोहळ्याला सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ पासून उत्साहात सुरुवात झाली आहे.

भगवान रामेश्वर शिव मंदिर, रामकृष्ण नगर, बीड.येथे सोहळ्याच्या पहिल्या दिवशी ह.भ.प. नवनाथ महाराज नाईकवाडे यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवपुराणाचे महत्त्व विशद करण्यात आले. यावेळी रामकृष्ण नगर परिसरातील नागरिक, विशेषतः महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. भक्तिमय वातावरण आणि शिवनामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.सलग आठ दिवस चालणाऱ्या या ज्ञान यज्ञाची सांगता १६ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. या काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, जास्तीत जास्त भाविकांनी कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# उद्योगक्षेत्रात पत्रकार प्रदीप गायकवाड यांची गरुडझेप

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केलेले, वंचित बहुजन आघाडीचे प्रसिद्धीप्रमुख,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे उपाध्यक्ष तथा दैनिक महाभारत चे तालुका प्रतिनिधी श्री. प्रदीप गायकवाड यांनी आता उद्योग क्षेत्रात मोठी भरारी घेतली आहे. आपल्या व्यवसायाचा विस्तार करत त्यांनी टाटा कंपनीचा नवीन टिप्पर खरेदी केला असून, नुकताच याचा भव्य उद्घाटन सोहळा मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत संपन्न झाला.पत्रकारितेच्या माध्यमातून जन सामान्यांचे प्रश्न मांडणारे प्रदीप गायकवाड हे एक 'युवा उद्योजक' म्हणूनही सातत्याने प्रगती करत आहेत.त्यांच्या या नवीन व्यवसायामुळे केज तालुक्यातील उद्योग क्षेत्रात त्यांचे कौतुक होत आहे.



**मान्यवरांची उपस्थिती आणि शुभेच्छांचा वर्षाव**

या नवीन वाहनाच्या पूजन प्रसंगी केज तालुक्यातील विविध क्षेत्रांतील दिग्गज मंडळी उपस्थित होती.यामध्ये प्रामुख्याने तालुक्यातील नामवंत उद्योजक, व्यावसायिक,पत्रकार बांधव आणि मोठ्या कंत्राटदारांचा (गुत्तेदार) समावेश होता.उपस्थित सर्वांनी गायकवाड यांच्या कष्टाचे आणि जिद्दीचे कौतुक करत,हा टिप्पर त्यांच्या प्रगतीचा नवा मार्ग ठरेल,असा विश्वास व्यक्त केला.

**तरुणांसाठी प्रेरणादायी पाऊल**

केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय उभा करून पत्रकार प्रदीप गायकवाड यांनी केज तालुक्यातील तरुणांसमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.सामाजिक जबाबदारी सांभाळून व्यावसायिक यश कसे मिळवता येते,याचे उत्तम उदाहरण त्यांनी घालून दिले आहे.या कार्यक्रमा च्या सांगतेवेळी उपस्थित मित्र परिवाराने आणि हितचिंतकांनी प्रदीप गायकवाड यांना पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत संत रविदास महाराज जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेत संत रविदास महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.संत रविदास महाराज यांचा जन्म १३७६ सालामध्ये पोर्णिमेच्या दिवशी उत्तरप्रदेशात वाराणसी शहरातील गोवर्धनपुर मध्ये झाला.संत रविदास यांचा जन्म रविवारी झाल्याने त्यांचे नाव रविदास असे ठेवले. वडील संतोख दास व आईचे नाव कर्मादेवी होते.ते एक भारतीय महान संत,कवी व समाजसुधारक होते.ते दयाळू व दानवीर होते. त्यांना संतशिरोमणी संत गुरु ही पदवी देण्यात आली.त्यांनी मन चंगा तो कटौती में गंगा यामधून ईश्वरभक्ती फक्त देखावा नसून मनातुन खरी भक्ती असावी व भक्तीमध्ये खरेपणा,प्रेम आणि सेवाभाव असावा असे सांगितले.त्यांनी जातीभेद व अस्पृश्यतेला विरोध केला व सामाजिक ऐक्य निर्माण केले.त्यांनी लोकांना खरी भक्ती व सद्मार्ग दाखवून भक्तीत बाहेरील अवडंबर नसावा असे सांगून आत्मज्ञान मार्ग दाखविला.त्यांनी भक्तीगीतातुन समाज प्रबोधन केले.असे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी आपल्या प्रास्ताविक पर भाषणात सांगितले.या शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर,गणित,विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री. संदीप मेघराज ठोंबरे सर, श्री.राहुल बजरंग बचुटे सर,श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम,ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनी विचार व्यक्त केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती,शिक्षण प्रेमी नागरिक,सर्व शिक्षक शिक्षिका वृंद,पीएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार स्वर्णमाला पवार,अनिता पवार,विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.राहुल बजरंग बचुटे सर यांनी केले व श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम यांनी आभार मानले.

# रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांनी चांगला माणूस व्हावे-डॉ.हनुमंत सौदागर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



जिद्द,चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर कोणतेही यश संपादन करता येते.मात्र फक्त यशस्वी नव्हे तर चांगला माणूस होणे अधिक महत्त्वाचे आहे असे प्रेरणादायी मत डॉ. हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.ते केज शहरातील रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.खोसे सर हे होते.यावेळी शिक्षक वर्ग,विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शनिवार रोजी दहावीचा स्वयंशासन दिन आणि निरोप समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नियोजन करत स्वयंशासन दिन साजरा केला.या उपक्रमासाठी वर्गशिक्षिका श्रीमती गिरी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळत शाळेचे कामकाज शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले.निरोप समारंभात श्री.देशमुख,श्रीमती डॉ. गिरी,श्री.गोरे,श्री. गायकवाड आणि श्री. नाईकनवरे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.पुढे बोलताना डॉ.सौदागर यांनी विद्यार्थ्यांना स्व अनुशासनाचे महत्त्व पटवून दिले.अभ्यास करताना एकाग्रता आणि अवधान किती आवश्यक आहे यावर त्यांनी विशेष भर दिला.आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होणे सोपे झाले असून, अशा परिस्थितीत अवधान टिकवणे ही मोठी कसरत असल्याचे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक श्री.खोसे सर यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा सल्ला दिला.जीवनात यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास,परिश्रम आणि योग्य दिशा महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक कदम यांनी केले, तर संपूर्ण नियोजन नववीच्या विद्यार्थ्यांनी सांभाळले.कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती उगले यांनी उपस्थितांचे आभार मानले.उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत त्यांना नव्या वाटचालीसाठी प्रेरणा दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077